महा मेट्रो

PUNE METRO

**35-40 years old entangled twin trees transplanted by MahaMetro.**

दि. 14.08.2018

पुणे मेट्रो प्रकल्प हा पर्यावरण पुरक प्रकल्प असुन शहराचे हरीत करण्याच्या धोरणास (Go Green) महामेट्रोचा पुर्ण पाठिंबा आहे. पुणे मेट्रो प्रकल्पाचे पीसीएमसी ते रेंज हिल या मार्गिका क्र-1 चे काम वेगाने सुरू आहे. पुणे व पिंपरी चिंचवड हरित शहर असल्यामुळे महामेट्रोने मेट्रोच्या कामामध्ये अडथळा ठरणारे वृक्ष न तोडता त्यांचे पुनर्रोपण करण्याचे ठरविलेले आहे. त्यास अनुसरून आजपर्यंत पिंपरी चिंचवड ते दापोडी या भागातील मेट्रोच्या कामामध्ये अडथळा ठरणा-या सुमारे 408 वृक्षांचे पुनर्रोपण यशस्वीपणे केले आहे.

नाशिकफाटा -भोसरी येथील प्रस्तावित मेट्रो स्टेशनच्या कामामध्ये पिंपळ व रेनट्री एकमेकांत गुंफले असल्याने असे दोन मोठे वृक्ष होते. त्यांचा घेर अनुक्रमे 3.40 मी. व 3.50 मी. इतका होता. ही दोन्ही झाडे सुमारे 35 ते 40 वर्ष जुनी होती. पिंपळ व रेनट्री वृक्ष एकमेकांत गुंफल्याने या जोड वृक्षांचे अशक्य प्राय असलेले पुनर्रोपणाचे काम महामेट्रोने विशेष प्रयत्न करून दि. 11.08.2018 रोजी यशस्वीपणे पुर्ण केले आहे. या जोड वृक्षांभोवती सुमारे 7 फुट खोल खोदकाम करून जेसीबी व क्रेन च्या सहाय्याने प्रथमत: या वृक्षांना वेगेवेगळे करून त्यांचे पुनर्रोपण केले. हे काम सकाळी 6 वाजलेपासुन रात्री 10 वाजेपर्यंत पुर्ण केले. हे काम करीत असताना पुणे ते निगडी च्या दिशेने सेवा रस्त्यावरील वाहतुक दु. 11.00 पासुन संध्याकाळी 6 वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आली होती. या जोड वृक्षांना एकमेकांपासुन वेगळे करून कासारवाडी येथील जलनिसा:रण प्रकल्पाच्या आवारामध्ये पुनर्रोपणाचे काम यशस्वीपणे महामेट्रोने केले आहे.

सदर वृक्ष पुनर्रोपणाचे काम मे. ग्रीन मॉर्निंग हॉर्ट्रीकल्चर प्रा.लि. यांनी श्री. गौतम बि-हाडे, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, श्री बी.जी माने व श्री सुमीत श्रीवास्तव यांचे देखरेखीखाली पूर्ण केले. या कामासाठी

वाहतुक संचलनाचे नियोजन व अंमलबजावणी स्थानिक वाहतुक पोलिसांच्या मदतीने किशोर करांडे यांनी केले.